पुणे

शनिवार
22
ऑगस्ट 2026

· वर्ष : 01
· अंक : 263
· किंमत : 3 रू.
· पाने : 4+2

हॅलो
प्रभात

■ मुंबई ■ अहिल्यानगर ■ कोल्हापूर ■ सातारा ■ सांगली

पुणे आवृत्ती





PRGI NO. MAHMAR/25/A3118 ■ शनिवार, २२ ऑगस्ट २०२६ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४+२


# मतदार नोंदणी सुनावण्यांचे बारकाईने नियोजन करा

## मिनल कळसकर ; तांत्रिक नियोजनात कसूर नको

### ▶▶ 31 ऑगस्ट ते 30 सप्टेंबर दरम्यान दावे-हरकतींवर सुनावणी

**पुणे : हॅलो प्रभात**

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत प्राप्त दावे आणि हरकतींवर सुनावणी घेण्यासाठी पुणे जिल्हा प्रशासनाने तयारी सुरू केली आहे. भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या सुधारित वेळापत्रकानुसार ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे आणि हरकतींवर सुनावणी घेण्यात येणार आहे. या प्रक्रियेत मतदारांना कोणतीही अडचण येऊ नये तसेच सुनावणीची प्रक्रिया तांत्रिकदृष्ट्या सक्षम आणि पारदर्शक पद्धतीने पार पडावी, यासाठी मतदार नोंदणी अधिकारी आणि सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी बारकाईने नियोजन करावे, अशा सूचना उप जिल्हा निवडणूक अधिकारी मिनल कळसकर यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयातील बहुउद्देशीय सभागृहात पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील मतदार नोंदणी अधिकारी आणि सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांना सुनावणी प्रक्रियेबाबत प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणावेळी कळसकर यांनी सुनावणीच्या ठिकाणापासून ते कागदपत्रांची तपासणी, निर्णयाची नोंद, ऑनलाइन माहिती भरणे आणि अभिलेख जतन करण्यापर्यंतच्या विविध बाबींचे नियोजन करण्याच्या सूचना दिल्या. जुन्नर, आंबेगाव, खेड-आळंदी, शिरूर, दौंड, इंदापूर, बारामती, पुरंदर, भोर, राजगड, मुळशी आणि मावळ तालुक्यांचे प्रांताधिकारी यावेळी उपस्थित होते.

सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांना मतदान केंद्रांचे विभाग वाटप करण्यात आले आहे. या विभागातील मतदारांना सुनावणीसाठी दूरवर जावे लागू नये, याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. संबंधित मतदान केंद्रांपैकी योग्य ठिकाणी सुनावणीची व्यवस्था करण्यात येणार आहे. एखाद्या सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्याकडे दहा गावे असल्यास त्या गावांतील मतदारांना सोयीचे होईल अशा जवळच्या ठिकाणी प्रत्येक मतदान केंद्रासाठी स्वतंत्र दिवस निश्चित करून सुनावणीचे वेळापत्रक तयार करावे, असे कळसकर यांनी स्पष्ट केले.

मंडळ अधिकाऱ्यांच्या कार्यालयात सुनावणी आयोजित करण्याचा निर्णय घेतल्यास ते ठिकाण संबंधित मतदाराच्या पत्त्यापासून दोन किलोमीटरच्या अंतरात असेल, याचीही दक्षता घेण्यात येणार आहे. सुनावणीची तारीख, ठिकाण आणि वेळ याबाबत मतदारांना पुरेशी माहिती उपलब्ध करून देण्यावरही प्रशासनाचा भर राहणार आहे. ग्रामीण भागातील मतदारांना प्रवासाचा त्रास होऊ नये आणि अधिकाधिक मतदारांना सुनावणीस उपस्थित राहता यावे, या दृष्टीने सुनावणी केंद्रांचे नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

सुनावणीच्या ठिकाणी आवश्यक तांत्रिक सुविधा उपलब्ध ठेवण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.



### मतदान केंद्रनिहाय व्यवस्था करण्याच्या सूचना

इंटरनेट सुविधा, संगणक, प्रिंटर तसेच अन्य आवश्यक साहित्याची आधीच व्यवस्था करून ठेवावी, असे कळसकर यांनी सांगितले. सुनावणीच्या ठिकाणी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध असेल, याचीही खात्री करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. प्रत्यक्ष सुनावणीच्या वेळी कामकाजात कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी तांत्रिक आणि प्रशासकीय तयारी आधीच पूर्ण करण्यावर भर देण्यात आला आहे.

सुनावणीच्या ठिकाणी सहा पथके कार्यरत ठेवण्यात येणार आहेत. या पथकांकडून सुनावणीशी संबंधित विविध कामे केली जाणार आहेत. गणना पत्रक काढून देणे, रोजनामा लिहिणे, मतदारांनी सादर केलेल्या पुराव्यांच्या कागदपत्रांची तपासणी करणे, सन २००२ च्या मतदार यादीमध्ये संबंधित मतदाराचे नाव तपासणे आणि नातेवाईकांच्या नावासोबत मॅपिंग करण्याचे काम केले जाणार आहे. सुनावणीदरम्यान दिलेल्या निर्णयाच्या दोन प्रती तयार करण्यात येणार असून त्यापैकी एक प्रत संबंधित मतदाराला देण्यात येईल, तर दुसरी प्रत गणना पत्रकासोबत संबंधित फाईलमध्ये ठेवण्यात येणार आहे.

मतदारांनी सादर केलेली कागदपत्रे तसेच मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी दिलेला निर्णय ऑनलाइन अपलोड करण्याची कार्यवाहीही करण्यात येणार आहे. सुनावणीची संपूर्ण प्रक्रिया कागदोपत्री नोंदविण्याबरोबरच ऑनलाइन पद्धतीनेही अद्ययावत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सुनावणीदरम्यान तयार होणारे कागदपत्रे, मूळ आदेश, रोजनामा, नोटीस आणि इतर अभिलेख योग्य पद्धतीने जतन करण्याचे निर्देशही अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. दरम्यान, सुनावणीसाठी उपस्थित राहताना संबंधित मतदारांनी आपली मूळ कागदपत्रे सोबत आणावीत, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी सहा नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सुनावणीदरम्यान एखादे कागदपत्र शंकास्पद आढळल्यास त्याची पुढील पडताळणी केली जाणार आहे. संबंधित कागदपत्रे पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, जिल्हा परिषद पुणे, पासपोर्ट कार्यालय पुणे तसेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संबंधित नोडल अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येणार आहेत.

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनीही कागदपत्रांच्या पडताळणीची प्रक्रिया काळजीपूर्वक करण्याच्या सूचना दिल्या आहेत. मतदारांनी सुनावणीच्या वेळी आवश्यक मूळ कागदपत्रांसह उपस्थित राहावे आणि प्रशासनाने मागणी केलेली माहिती किंवा पुरावे उपलब्ध करून द्यावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. मतदार यादी अधिक अचूक आणि अद्ययावत करण्याच्या दृष्टीने ही सुनावणी महत्त्वाची असल्याने प्रत्येक दाव्याची आणि हरकतीची नियमानुसार छाननी करून निर्णय घेण्याचे प्रशासनाचे नियोजन आहे. विशेष सखोल पुनरीक्षणाच्या प्रक्रियेत प्राप्त झालेल्या दावे आणि हरकतींची सुनावणी पूर्ण करण्यासाठी आता प्रशासनाची यंत्रणा प्रत्यक्ष कामाला लागली आहे. मतदारांना त्यांच्या हक्काशी संबंधित बाबी मांडण्यासाठी योग्य संधी मिळावी, त्यांची कागदपत्रे तपासली जावीत आणि पात्र मतदारांची नावे मतदार यादीत अचूकपणे कायम राहावीत, यासाठी सुनावणीची प्रक्रिया नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्याचे प्रशासनाने निश्चित केले आहे.

# शेतात ‘एआय’ ; १० हजार शेतकरी डिजिटल प्रयोगात

## पीकनिहाय सल्ल्यापासून सिंचन व्यवस्थापनापर्यंत तंत्रज्ञानाचा वापर

**मुंबई : हॅलो प्रभात**

शेतीतील उत्पादकता वाढवून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी राज्यात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ‘डिजिटल ट्विन लर्निंग’वर आधारित प्रकल्प प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात कापूस, सोयाबीन, तूर, ऊस, संत्रे, हळद, कांदा आणि मका या आठ पिकांसाठी १० हजार शेतकऱ्यांची निवड केली जाणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या बैठकीत याबाबत निर्देश दिले. हवामान बदल, पाणीटंचाई, घटती जमिनीची सुपीकता, कीड-रोगांचा वाढता प्रादुर्भाव आणि वाढता उत्पादन खर्च या आव्हानांवर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मात करण्याचा प्रयत्न आहे.

**उत्पादन खर्च घटवून उत्पन्न वाढविण्याचा सरकारचा निर्धार**





या प्रकल्पात उपग्रह तंत्रज्ञान, ड्रोन, सेन्सर्स आणि माहिती विश्लेषणाचा वापर करून पिकांची वाढ, जमिनीतील ओलावा, पाण्याची गरज, हवामान, कीड-रोग आणि संभाव्य उत्पादनाची माहिती संकलित केली जाणार आहे. त्याचे यंत्र-अध्ययनाद्वारे विश्लेषण करून शेतकऱ्यांना शेतनिहाय पीक सल्ला दिला जाणार आहे.

बारामतीच्या कृषी विकास न्यासाने विकसित केलेल्या या प्रकल्पाच्या यशानंतर त्याची राज्यभर मोठ्या प्रमाणावर अंमलबजावणी करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

# आज सांगलीत रोजगार मेळावा



**सांगली : हॅलो प्रभात**

स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस व उडाण जॉबच्या वतीने आज शनिवारी (दि. २२) रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मेळाव्यात सुमारे ७० कंपन्यांचा सहभाग असून, आतापर्यंत २ हजार १६१ युवक-युवतींनी नोंदणी केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष पद्माकर जगदाळे व उडाण जॉबच्या संचालिका नेहा खापरे यांनी ही माहिती दिली. युवक-युवतींना रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देणे आणि कंपन्यांना कुशल मनुष्यबळ मिळवून देणे हा मेळाव्याचा उद्देश आहे. नोंदणीसाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. बारावी, पदवी, आयटीआय, तसेच विविध क्षेत्रांतील डिप्लोमाधारकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. मेळाव्यास तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

# आ.सुहास बाबर यांच्या पाठपुराव्याला केंद्राची ‘१४.८४ कोटींची’ मंजुरी

## कराडविजापूर महामार्गावरील रखडलेल्या कामाला गती

### ▶▶ घाट, पूल आणि धोकादायक भागांचा मार्ग होणार सुकर

**विटा : हॅलो प्रभात**

कराडविजापूर राष्ट्रीय महामार्ग क्र. १६६ ई वरील प्रलंबित कामांना अखेर मोठी गती मिळाली आहे. विटानागज मार्गावरील उर्वरित १० किलोमीटर रस्त्याचे रुंदीकरण व दर्जोन्नती करण्यासाठी केंद्र सरकारने तब्बल १४ कोटी ८४ लाख रुपयांच्या निधीस मंजुरी दिली आहे. आमदार सुहास बाबर यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला हे मोठे यश मानले जात आहे.

या कामासाठी आमदार बाबर यांनी २३ जुलै रोजी दिल्ली येथे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली होती. महामार्गावरील रखडलेली कामे, खराब रस्त्यामुळे नागरिकांना होणारा त्रास आणि अपघातांचा वाढता धोका याबाबत त्यांनी गडकरी यांच्याशी चर्चा करून तातडीने निधी मंजूर करण्याची मागणी केली होती.



कराड-कडेगाव-विटा-नागज मार्गावरील बहुतांश काम पूर्ण झाले असले, तरी रेणावी गाव व घाट, रेवणगाव घाट, सुलतानगादे, हिवरे पूल आणि नागज घाट परिसरातील कामे वनविभागाच्या परवानग्या व अन्य तांत्रिक कारणांमुळे रखडली होती. या भागातील रस्ता खराब झाल्याने वाहतुकीसह अपघातांचा धोका वाढला होता. उर्वरित काम पूर्ण झाल्यानंतर शेतमाल वाहतूक, व्यापार, शिक्षण, आरोग्यसेवा आणि दैनंदिन प्रवासाला मोठी चालना मिळणार असून घाटातील अपघातांचाही धोका कमी होणार आहे.

नागरिकांना सुरक्षित आणि दर्जेदार दळणवळण व्यवस्था मिळावी, यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. गडकरी यांनी मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत एका भेटीतच १४.८४ कोटींच्या कामाला मंजुरी दिली, असे आमदार सुहास बाबर यांनी सांगितले.

## गणेशोत्सवासाठी एसटीच्या ग्रुप बुकिंगचे अतिरिक्त शुल्क रद्द



**मुंबई : हॅलो प्रभात**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या भाविकांना दिलासा देणारा निर्णय एसटी महामंडळाने शुक्रवारी घेतला. या निर्णयानुसार आता संपूर्ण एसटी बस आरक्षित (ग्रुप बुकिंग) करण्यासाठी आकारण्यात येणारे ३० टक्के अतिरिक्त शुल्क रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे ग्रुप बुकिंगने कोकणात जाणाऱ्या गणेश भक्तांचा प्रवास स्वस्त झाला आहे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले.

# गणेशोत्सवासाठी सांगली महापालिका सज्ज

## रस्ते दुरुस्तीपासून कृत्रिम विसर्जन तलाव व स्वच्छतेपर्यंत नियोजन

**सांगली : हॅलो प्रभात**

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सांगली-मिरज-कुपवाड महापालिकेने तयारीला वेग दिला आहे. महापौर धीरज सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली सांगली व कुपवाड शहरातील गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन उत्सवादरम्यानच्या सुविधा, वाहतूक, सुरक्षा, स्वच्छता आणि विसर्जन व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला. मोठ्या मूर्तींच्या आगमन व विसर्जनावेळी कमानी, विद्युत तारा आणि झाडांच्या फांद्यांमुळे होणाऱ्या अडचणी सोडविण्याचे निर्देश देण्यात आले. विसर्जन घाटावर ये-जा करण्यासाठी स्वतंत्र मार्ग, बोट व सुरक्षा व्यवस्था तसेच मोठ्या मूर्तींसाठी क्रेन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याचे काम तातडीने सुरू करण्यात आले असून, मिरवणूक मार्गावरील विद्युत तारांची पाहणी केली जाणार आहे. मंडप परवानगीसाठी प्रभागनिहाय एक खिडकी योजना सुरू करण्यात आली आहे. विसर्जनस्थळी रुग्णवाहिका, स्वच्छतागृहे आणि स्वच्छतेची व्यवस्था केली जाणार आहे.



### मंडळांच्या अडचणींवर तातडीचे निर्णय

पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी पाच फुटांपेक्षा कमी मूर्तींचे कृत्रिम विसर्जन स्थळ अथवा शेततळ्यात विसर्जन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. उत्कृष्ट सजावट व देखाव्यांसाठी महापालिकेतर्फे रोख बक्षिसेही जाहीर करण्यात आली आहेत.

# खो-खो असोसिएशनचे कामकाज पेपरलेस होणार

### खेळाडूंच्या अडचणी सोडविण्याची ग्वाही

## सुनेत्रा पवार यांच्या हस्ते जिल्हा संघटकांना लॅपटॉपचे वितरण

**पुणे : हॅलो प्रभात**

बदलत्या काळानुसार नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करून महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे कामकाज पेपरलेस करण्याच्या उद्देशाने जिल्हा संघटकांसह तांत्रिक समितीला लॅपटॉपचे वितरण उपमुख्यमंत्री तथा महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या अध्यक्ष सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

खेळ आणि खेळाडूंच्या सन्मानासाठी तसेच त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी आपण सदैव पाठीशी राहू, अशी ग्वाही पवार यांनी यावेळी दिली.



बदलत्या युगात नवीन तंत्रज्ञान स्वीकारणे ही काळाची गरज असून लॅपटॉप वितरणामुळे असोसिएशनच्या पेपरलेस कामकाजाला सुरुवात होईल. स्व. अजितदादांनी खो-खो खेळाच्या प्रगतीसाठी तळमळीने प्रयत्न केले. त्यांच्याच संकल्पनेतून ही सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे पवार यांनी सांगितले.

कै. भाई नेरुरकर चषक राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा ऑक्टोबरमध्ये बारामती येथे होणार असून त्यासाठी असोसिएशनने तयारीला सुरुवात करावी, असेही त्यांनी सांगितले. यावेळी अहिल्यानगर, बीड, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, धुळे, हिंगोली, जळगाव, जालना, लातूर, मुंबई, मुंबई उपनगर, नांदेड, नंदुरबार, पालघर, परभणी, पुणे, रत्नागिरी, रायगड, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, सोलापूर आणि ठाणे जिल्ह्यांच्या सचिवांना लॅपटॉप सुपूर्द करण्यात आले.

कार्यक्रमास असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांसह अर्जुन पुरस्कारप्राप्त सुरेखा कुलकर्णी, जनार्दन शेळके, श्रीरंग इनामदार आदी उपस्थित होते.